दै. देशोन्नती दि. ०४/०२/२०२५

# रस्त्यावर केक कापणारे, दारू पिणारे व पाजणाऱ्यांवर सिटी स्ट्रिट सेप्टी ड्राईव्ह पथकाची कारवाई



देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सिटी स्ट्रिट सेप्टी ड्राईव्हचे पथक प्रमुख सपोनि संकेत दिघे यांना नांदेड शहरात रोडवर केक कापणारे, दारू पिणारे व पाजणाऱ्या इसमांवर कायदेशिर कारवाई करण्याकरीता आदेश दिले होते. त्या अनुषंगाने सिटी स्ट्रिट सेप्टी ड्राईव्ह पथकाने २ फेब्रुवारी रोजी शिवाजीनगर हद्दीतील आनंदनगर येथील राज वाईन शॉपचे चालक यांनी वाईन शॉप येथे वाईन विकण्यासोबतच अवैधरित्या दारू पिण्याकरीता जागा उपलब्ध करून दिल्यावरून नांदेड सिटी स्ट्रिट सेप्टी ड्राईव्ह पथकाने ७ इसम व दुकान चालक अशा एकुण ८ इसमांविरूध्द कारवाई करण्यात आली आहे.

तसेच आयटीआय चौक येथे वाढदिवसानिमीत्त सार्वजनिक ठिकाणी केक कापणाऱ्या ६ जणाविरूध्द कारवाई केली आहे. विमानतळ व भाग्यनगर हद्दीमध्ये सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालुन शांतता भंग करणारे एकुण १५ जणाविरुध्द कारवाई करण्यात आली. असे एकुण २९ जणांवर कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे. या पथकात सपोनि संकेत दिघे, सपोउपनि दिपक जोशी, पोकॉ, ज्ञानेश्वर बोईनवाड, नविद वाहीद, नवनाथ नागरगोजे, विजय सुर्यवंशी, सय्यद मगदुम, शिवराज आडबे, ज्ञानेश्वर तेलंग, प्रविण शिंदे यांचा समावेश होता.

दै. गोदातीर

# रस्त्यावर वाढदिवस साजरा करणाऱ्यांवर कारवाई



नांदेड (प्रतिनिधी)- शहरात रोडरोमिओ, दारू पिणारे, रस्त्यावर गोंधळ करणारे यांच्यावर प्रतिबंध घालण्यासाठी स्थापन केलेल्या सिटी स्ट्रिट सेप्टी ड्राईव्ह पथकप्रमुख सपोनि संकेत दिघे यांनी शहरात रस्त्यावर वाढदिवसाचे केक कापणारे, दारू पिणारे व पाजणाऱ्या व्यक्तींवर कायदेशिर कारवाई केली.

शिवाजीनगर ठाण्याच्या हद्दीतील आनंदनगर येथील राज वाईन शॉपचे चालक यांनी वाईन शॉप येथे वाईन विकण्यासोबतच अवैधरित्या दारू पिण्याकरीता जागा उपलब्ध करून दिल्यावरून ७ व्यक्ती व दुकान चालक अशा ८ जणांविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६८ व कलम ६४ अंतर्गत कारवाई केली आहे. तसेच आयटीआय चौकात वाढदिवसानिमीत्त केक कापणाऱ्या ६ जणांविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११०/११७ प्रमाणे कारवाई केली आहे. या सोबतच विमनतळ व भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालून शांतता भंग करणाऱ्या १५ जणांविरुध्द कारवाई करण्यात आली. अशा एकुण २९ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संकेत दिघे, सपोउपनि दिपक जोशी, अंमलदार ज्ञानेश्वर बोईनवाड, नविद वाहीद, नवनाथ नागरगोजे, विजय सुर्यवंशी, सय्यद मगदुम, शिवराज आडबे, ज्ञानेश्वर तेलंग, प्रविण शिंदे यांनी केली आहे.